**National Centre for School Leadership, NIEPA, New Delhi**
**Maharashtra Institute of Educational Planning and Administration, Chhatrapati Sambhajinagar, Maharashtra**

## यशोगाथेचे शीर्षक

# “शाळेतील विद्यार्थ्यांची पटनोंदणी वाढ, गळती कमी करून गुणवत्ता वाढविणारी कामगारवस्ती ,झोपडपट्टीतील मुलांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नेणारी डीजीटल मनपा शाळा”

**✷प्रेरणा ✷**

**मा. डॉ. चारू मलिक**
**विभागप्रमुख, NCSL विभाग, NIEPA, New Delhi**

✷सादरकर्ते✷



**कुंदा जयवंत बच्छाव**
**सहाय्यक शिक्षिका,**
**म. न. पा. शाळा क्र. १८, आनंदवली, नाशिक**

**✷मार्गदर्शक ✷**

**श्री. बी. टी. पाटील**
**प्रशासन अधिकारी, म. न. पा., नाशिक**
**श्रीमती अनिता जाधव**
**मुख्याध्यापिका, म. न. पा. शाळा क्र. १८, आनंदवली, नाशिक**

✷शैक्षणिक वर्ष ✷

(२०२४-२५)

**शाळेचे नाव व पूर्ण पत्ता :** नाशिक महानगरपालिका शाळा क्र.१८, आनंदवली, नाशिक, ता. जि. नाशिक, महाराष्ट्र

**Email id :** kirankunda1900@maa.ac.in

**मुख्याध्यापकाचे नाव :** सौ. अनिता संजय जाधव, मोबाईल क्र.

**Email id :** nmcsn18anandwali@gmail.com, kirankunda1900@gmail.com

**केसस्टडी पाठविणाऱ्या शिक्षिका :** श्रीम. कुंदा जयवंत बच्छाव, ९४२०६९५०६५

**शाळेचे व्यवस्थापन-** महानगरपालिका (उच्च प्राथमिक शाळा)

**शाळेचे माध्यम-** मराठी

**शाळेतील इयत्ता-** पहिली ते आठवी ( इ. १ ली ते ८ वी)

**शाळेची एकूण विद्यार्थी संख्या** - ७८५

---

नगर पालिकेची शाळा म्हणजे शिकविण्याच्या बाबतीत उदासीन, सोई सुविधांनी अपूर्ण एकूणच विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण न देवू शकणाऱ्या शाळा असा समाजाचा दृष्टीकोन पूर्णपणे खोडून टाकला तो नाशिक महानगरपालिकेच्या आनंदवलीतील शाळा क्र.१८ ने. आजूबाजूला असलेल्या इंटरनॅशनल इंग्रजी माध्यमाच्या तसेच खाजगी शाळांच्या स्पर्धेत आपल्या शाळेची गुणवत्ता टिकवत दर्जेदार शिक्षण देवून संपूर्ण शहरात शाळेचा पट सुमारे 7८5 पर्यंत नेणारी एकमेव मनपा शाळा ठरली असून विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आन्तरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देत असल्याने राज्यभरातील इतर शिक्षक व पालकांसाठी आकर्षण व प्रेरक ठरत आहे. शाळेच्या या वैशिष्ट्यपूर्ण शैक्षणिक कार्याची शासनाद्वारे दखल घेतली गेली असून महाराष्ट्रशासनामार्फत मॉडेल स्कूल मध्ये निवडल्या गेलेल्या निवडक शाळांमध्ये आनंदवली मनपा शाळा देखील निवडली गेली आहे ही येथील मुख्याध्यापकासह शिक्षकांच्या कार्याची खरी पावती म्हणावी लागेल.

**१. यशोगाथा क्षेत्र/ विषय/ शीर्षक - "शाळेतील विद्यार्थ्यांची पटनोंदणी वाढ, गळती कमी करून गुणवत्ता वाढविणारी कामगारवस्ती ,झोपडपट्टीतील मुलांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नेणारी डीजीटल मनपा शाळा"**

**२. प्रास्ताविक -**

**"करी माय-बापाचे प्रेम, देई शिक्षणाची धार,**

**सांभाळी प्रत्येक मुलाला, माझी शाळा दमदार !**

नाशिक शहराच्या आनंदवली गाव,संत कबीर नगर  झोपडपट्टीत, कमी जागेत, शहराच्या मध्यवस्तीत वसलेली आमची नाशिक महानगरपालिका शाळा क्र.१८, आनंदवली, नाशिक शाळा. आमच्या शाळेत येणारी मुले ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल परिवारातील असून यांच्या परिवारात जगणं हेच मोठ दिव्य असून त्यांच्या लेखी शिक्षणाला अजिबात महत्त्व नसतं किंवा जगण्याच्या लढाईत ते शिक्षणाला महत्त्व देऊ शकत नाही. दारिद्र्य, गरिबी, पालकांची निसाक्षरता प्रत्येक मुलाच्या पाचविला पुजलेले. कुणाचे आई नाही, तर कुणाचा बाप नाही. जे आहेत ते पालक मुलांच्या शिक्षणासाठी जास्त योगदान न देणारे. कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी, उदर निर्वाह करण्यासाठी पालक आपल्या मुलांना नियमित शाळेतही पाठवत नसत. तसेच  लहान बहिण भावंडांना सांभाळण्यासाठी व घरातली काम करण्यासाठी आपल्या घरातली मुलींना  पालक शाळेत न पाठवता घरी ठेवत असत व  तेरा चौदा  वयातच त्यांचे लग्न लावून देत. बालविवाह, शाळाबाह्य विद्यार्थी, कमी पटनोंदणी, गळती यासारख्या समस्या आमच्या शाळेत आम्हाला सतावत होत्या. त्यात सर्वात गंभीर म्हणजे बाल विवाहाची समस्या. या परिसरातील मुलींचे बालविवाह होत असल्याने बालविवाह मुळे शाळेचा पट कमी होणे ही समस्या गंभीर होत होती. तसेच आजूबाजूला असलेल्या मोठमोठ्या खाजगी शाळा, इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या चकमकीला काही पालक हुरळून जात होते व आपल्या पाल्यांना त्या शाळेत प्रवेशित करत होते. यामुळे आमच्या आनंदवली शाळेचा पट ही कमी होऊ लागला होता, तसेच शाळेतील विद्यार्थ्यांची गैरहजेरी, गळती, स्थगिती सारख्या समस्या सतत वाढतांना आमच्या शाळेचे मुख्याध्यापिका  व शिक्षक यांना सतत जाणवत होत्या. यासाठी शाळेतील भौतिक सुविधा वाढ, अध्ययन- अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे, शिक्षकांमध्ये समन्वय, विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांसह आनंददायी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज मुख्याध्यापक व शिक्षकांना गरजेचे वाटू लागले. त्यामुळे वरील समस्या दूर करून शाळेची गुणवत्ता वाढ करण्याचे श्रीमती अनिता जाधव यांच्या नेतृत्वाने  व शाळेतील शिक्षिका श्रीमती कुंदा बच्छाव यांच्या पुढाकाराने सर्व शिक्षकांनी  ठरविले.

**३.      मुख्याध्यापक/ शिक्षक यांना या संदर्भात आलेल्या अडचणी/ या विषयावर अधिक केलेले काम -**

सर्वप्रथम शाळेच्या मुख्याध्यापिका यांच्यासह सर्व शिक्षकांनी आपल्या शाळेतील ही समस्या दूर करण्यासाठी काय करता येईल यावर चर्चा करून शाळेच्या प्रगतीत येणारी  प्रत्येक समस्या सोडविण्याचा निर्धार केला.    कार्यवाही करताना काही अडचणींना सामोरे जावे लागले.

१. सर्व शिक्षकांचे समन्वय करण्यास वेळ लागला.
२. शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांना उपक्रमात समावेशित करणे.
३. शाळेत असलेल्या अपुऱ्या पायाभूत सुविधा.
४. सुविधांसाठी निधी संकलन.
५. शैक्षणिक तंत्रज्ञान चे साहित्याची कमतरता.

यावर हि मात करण्याचा निर्धार करून सर्वप्रथम विद्यार्थी गृहभेटी करण्याचे ठरविले. घरोघर जाऊन शाळेच्या सर्व पालकांचे समुपदेशन केले. त्यांना शाळेतील गुणवत्ता, पालकांचा लागणारा प्रतिसाद, शाळेसाठी आवश्यक निधी संकलन याबाबत चर्चा करून योगदान देण्यास आवाहन केले.  सर्व पालकांना

नियमित शाळेत येवून आपल्या पाल्याच्या अभ्यासाबाबत चौकशी करण्यास, शाळेकडे लक्ष देण्यास, शाळेसाठी परिसरातील दानशूर व्यक्ती, माजी विद्यार्थी यांचेशी संपर्क करण्यासाठी आवाहन केले. तसेच नियमित पालक सभा घेऊन शाळेतील सोयी सुविधा वाढविण्यासाठी योगदान प्राप्त केले.

**४. या अडचणींवर मात करण्यासाठी मुख्याध्यापक/ शिक्षक यांनी केलेल्या उपाययोजना/ अंमलबजावणी -**

म्हणतात ना, "यथा राजा, तथा प्रजा" , " एक अच्छा नेता हमेशा अपने साथियो को साथ लेकर चलता है" अगदी याच उक्तीप्रमाणे मुख्या.श्रीमती अनिता जाधव व शाळेतील उपक्रमशील शिक्षिका श्रीमती कुंदा बच्छाव यांनी पुढाकार घेऊन सर्व शिक्षकांना शालेय गुणवत्ता वाढविण्यासाठी आयोजित करावयाच्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे नियोजन करून दिले. शिक्षकांचे प्राथमिक व उच्च प्राथमिक अश्या दोन गटात विभाजन करून सर्वांना विविध नाविन्यपूर्ण उपक्रम वाटून दिले. यात खालीलप्रमाणे उपक्रम गेल्या २ वर्षात शाळेत उत्तम नियोजनानुसार राबविण्यात आले.

**विविध नाविन्यपूर्ण उपक्रम व सातत्यपूर्ण प्रयत्नान्द्वारे आनंददायी शिक्षण :**

- **स्टेम क्लास -** कला, क्रीडा व संगीत या विषयातीलविद्यार्थ्यांची रुची व कौश्यल्य वाढविण्यासाठी शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या मदतीने खास क्यू आर कोडस बनवून कला, क्रीडा व संगीत विषयास चालना दिली. यासाठी शिक्षिका श्रीमती कुंदा बच्छाव यांनी शाळेत स्टेम क्लास बनवून विद्यार्थ्यांना सर्व शिक्षकांच्या मदतीने मार्गदर्शन करू लागल्या. यासाठी समाज सहभाग मिळवला. इयत्ता पाचवी ते आठवीचे सुमारे ४०० विद्यार्थी या उपक्रमाद्वारे गायन, गिटार वादन, कीबोर्ड वादन, नृत्य,क्यूब, बुद्धिबळ, कॅरम ,अब्याकस शिकले.व विविध राष्ट्रीय, राज्य स्पर्धांमध्ये भाग घेऊन यश मिळवू लागले. स्टेमक्लास द्वारे मुलांना कला कौशल्य शिकवणारी आनंदवली शाळा हि पहिली व एकमेव शाळा ठरली. आमच्या या उपक्रमास SCERT आयोजित नवोपक्रम स्पर्धेत राज्यस्तरावर द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले तर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान ची SPIF हि एक लाखाची फेलोशिप देखील मिळाली.
- **तरंगते वाचनालय (Hanging Library)-** विद्यार्थ्यांच्या वाचन संस्कृती विकसनासाठी, समजपूर्वक वाचन करण्यासाठी ३००० पुस्तके शाळेचे माजी विद्यार्थी, पालक, समाजातील दानशूर व्यक्ती यांचे कडून मिळवून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले. व प्रत्येक वर्गात आणि संपूर्ण शाळेत पहिल्या मजल्यापासून तिसऱ्या मजल्यापर्यंत विविध बालसाहित्य असलेले बोधकथा, आत्मवृत्त, वैज्ञानिक , विविध भाषिक पुस्तकांचे पुस्तके असलेली सुसज्ज हंगिंग लायब्ररी बनवली. विद्यार्थी अतिशय आवडीने मिळेल त्या वेळात हि पुस्तके वाचू लागली, टिपणे काढू लागली, पुस्तकांचे समीक्षण परिपाठात करू लागली. यामुळे विद्यार्थ्यांची वाचन क्षमता वाढली असून मुले कविता करू लागले,लेख लिहू लागले.
- **कवितेचा तास-** विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीस वाव मिळून लेखन व गायन कौशल्य विकसनासाठी दर शनिवारी कवितेचा तास हा उपक्रम राबविण्यात आला. यात जवळपास ९०

विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता बनवल्या. शाळेच्या शिक्षिका श्रीम. बच्छाव यांनी विद्यार्थ्यांच्या कवितांचे संपादन करून कविता उमलत्या कळ्यांचे हे पुस्तक प्रकाशित केले.

- **IDEA box -** विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होण्यासाठी विद्यार्थ्यांना सुचलेल्या नाविन्यपूर्ण वैज्ञानिक कल्पना संकलन करण्यासाठी शाळेत **IDEA box** बसवून विद्यार्थ्यांचे योगदान मिळविले. याद्वारे विद्यार्थ्यांना विज्ञान मेळावा, inspired award सारख्या स्पर्धांमध्ये सहभाग वाढला. ०२ विद्यार्थ्यांना सन २०२३-२४ मध्ये राष्ट्रीय स्तरावर इन्स्पायर अवार्ड मिळाला असून प्रत्येकी रु. १००००/- फेलोशिप मिळाली.
- **कामगारांच्या लेकरांना विमानप्रवासाच्या सहलीद्वारे विधानभवन अभ्यासाचा प्रत्येक्ष अध्ययन अनुभव-** शाळेतील शिक्षिका श्रीमती कुंदा बच्छाव यांनी लोकसहभागातून १०००० निधी संकलन करून मुख्याद्यापक यांच्या नियोजनाने शाळेतील ३५ विद्यार्थ्यांना विमानाने विधान भवन, मंत्रालय, मुंबई येथे भेट घडवून आणली. मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, पालकमंत्री, विविध IAS अधिकारी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी विधानसभा व विधानपरिषद यांचे १/१ तासाचे सत्र प्रत्येक्ष बघितले. नागरीकशास्त्राचा प्रत्येक्ष अभ्यास केला. हि सहल म्हणजे विद्यार्थी व शिक्षकांसाठी न भूतो, न भविष्यति असा अविस्मरणीय अनुभव ठरला. आम्ही देखील खूप शिकू व एक दिवस आमच्या आई वडिलांना विमानाने फिरायला नेवू अशी शपथ त्या दिवशी विद्यार्थ्यांनी घेतली.
- **लोकसहभागातून शाळेचा कायापालट -** शाळेतील आजी-माजी विद्यार्थी, पालक, समाजातील दानशूर व्यक्ती तसेच विविध विभागातील अधिकारी यांच्याद्वारे 25 ते 30 लाखाचा निधी गोळा करून शाळेच्या भौतिक सुविधा विकसित केल्या. शाळेच्या भौतिक सुविधा वाढवण्यासाठी लोकसहभाग वाढविला त्यासाठी समाज माध्यमांचा उपयोग करून घेतला. आजवर 25 ते 30 लाखांचा लोकसहभाग मिळवून शाळेला रंगरंगोटी, स्मार्ट टीव्ही, टेबलेट्स, शैक्षणिक साहित्य व अवांतर वाचनाची जवळपास 3000 पुस्तके, खुले वाचनालय विद्यार्थ्यांसाठी प्राप्त केली आहेत.
- **मुलांना शिक्षणासाठी आंतरराष्ट्रीय व्यासपीठ -** ई-ट्वीनिंग स्कूल, बांगलादेश प्रोजेक्ट, जर्मन भाषा अध्ययन, गूगल अर्थ यासारख्या आभासी प्रतलावरील प्रकल्पांद्वारे विद्यार्थ्यांच्या २१ व्या शतकातील संभाषण, साक्षरता, समन्वय यासारख्या कौशल्यांच्या विकासाला चालना दिली. अश्याप्रकारे नियमित शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या मनात शाश्वत विकास धोरण रुजवणूक करण्यात येते. प्लास्टिक मुक्त आपले शहर व देश, स्वच्छ भारत अभियान या द्वारे मुलांमध्ये आपल्या देशाप्रती प्रेम व काळजी या गुणांची रुज्वणूक केली.
- **डीजीटल माध्यमाने शिक्षण देणारी मॉडेल स्कूल -** शाळेमध्ये लोकसहभागातून टी. व्ही., संगणक, laptop, Tab प्राप्त करून डिजिटल शिक्षण नियमित दिले जाते. विद्यार्थी स्वतः टी. व्ही., संगणक, laptop, Tab द्वारे स्वयंअध्ययन करतात, याचमुळे आमच्या शाळेला शासनाने मॉडेल स्कूल म्हणून निवडली आहे. आनंददायी शिक्षणासाठी तंत्रज्ञानाचा, शैक्षणिक साहित्याचा वापर अध्यापनात करतात. आमच्या विद्यार्थांच्या वर्षभराची प्रगती, यश संग्रही करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वतचे इ पोर्ट फ़ोलिओ ओळखपत्र बनविण्यात आले आहे. संपूर्ण नाशिकमध्ये आपल्या विद्यार्थ्यांचे असे आय कार्ड बनवणारी आमची एकमेव शाळा आहे.

- **जीवन शिक्षण, मुल्यशिक्षण, व्यावसाईक शिक्षण देणारी एकमेव शाळा -** आपली भारतीय संस्कृती, प्रथा, परंपरा, मुल्ये, प्राचीन कला शिकून जपण्याचे, विद्यार्थ्यांना मनाचे श्लोक, संस्कृत सुभाषिते, ज्येष्ठांचा आदर, घरातील नियमित कामात सहभाग याद्वारे मूल्यशिक्षण शाळेत नियमित दिले गेले. समाजातील विविध थरातील व्यावसायिक यांना प्रत्यक्ष भेट देवून, शाळेतील व्यावसाय करणारे पालक यांना शाळेत त्यांच्या व्यवसायाबद्दल, त्यांचे अडचणी, व्यवसायातील चढ-उतार याबद्दल विद्यार्थ्यांना अनुभव देण्यात आले. उदा. चांभार, चहा-फळ विक्रेता, किराणा दुकानदार, साबण बनविणे, धूप बनविणे आदी. यामुळे विद्यार्थ्यांना जीवन शिक्षण, मुल्यशिक्षणाचा अनुभव मिळून त्यांचा व्यावसायिक दृष्टीकोन तयार झाला. त्यामुळे आज शाळेचा पट ७८५ पर्यंत वाढलेला आहे.
- **क्षेत्र भेटीद्वारे शिक्षण -** विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जीवनाचे अनुभव देण्यासाठी नियमित क्षेत्र भेटीचे आयोजन करून पोस्ट ऑफिस, बँक, शासकीय कार्यालये यांना प्रत्यक्ष भेट देवून तेथील कामकाज समजावून देण्यात आले. बँकेत वापरात येणारे विविध फोर्म्स, चेक, डिमांड ड्राफ्ट विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष भरून घेवून बँकेतील ठेवी, खाते, व्यवहार याची माहिती समजावून देण्यात आली. पोस्ट कार्यालयातून प्रत्यक्ष पत्र, लिफाफे कश्या नोंदी ठेवण्यात येतात, आवक-जावक प्रणाली, बाहेर गावी होणारे दळण-वळण याचाही तेथील अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत उद्बोधन करण्यात आले. पोलीस स्टेशन ला भेट देवून तेथील प्रत्यक्ष कामाचे स्वरूप, विविध लोकांशी होणारा संपर्क, विविध कार्यालयाचा पत्रव्यवहार ही समजून देण्यात येवून प्रत्यक्ष शासकीय काम जवळून समजून देण्यात आले.
- **शासनाद्वारे राबविलेल्या विविध उपक्रमांमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांचा नियमित सहभाग -** दीक्षा, शालेय पोषण आहार योजना, मेरी माटी मेरा देश, पीएम ई विद्या वाहिनी, NILP, NIPUN सारखे कार्यक्रम, शाळा प्रवेश कार्यक्रम, पहिले पाऊल, विविध शासकीय स्पर्धा यात शाळेतील शिक्षक, विद्यार्थी यांचा नियमित सहभाग नोंदवून त्यांचे योगदान घेण्यात आले. उदा प्राथमिक स्तरावर पहिले पाऊल प्रकल्पाद्वारा पालकांचे व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले, दीक्षा व पीएम ई विद्या वाहिनी वरील महाराष्ट्र राज्याचे कार्यक्रम ई-साहित्य विद्यार्थ्यांना शाळेतील इंतेरक्टीव panel वर नियमित दाखविण्यात आले व त्यात विद्यार्थी व शिक्षक यांचा सहभाग नोंदविण्यात आला. नव भारत साक्षरता कार्यक्रमाचे जिल्ह्यात प्रचार व प्रसारासाठी शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतः नाटक व लोकगीत ध्वनिमुद्रित केल्याने जिल्ह्यात या कार्यक्रमास चांगली प्रसिद्धी मिळून नवसाक्षर शोधण्यास मदत झाली.
- **शासनाच्या शिक्षणाचा उत्सव उपक्रमात शाळेला खास स्थान-** नाशिक जिल्हा परिषद आयोजित शिक्षण उत्सव मध्ये आमच्या शाळेतील उपक्रम संपूर्ण जिल्ह्यासमोर सादर करण्यासाठी खास निमंत्रित करण्यात आले हि आमच्य शाळेसाठी अभिमानाची बाब होती. तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून आमची शाळा मॉडेल स्कूल म्हणून निवडण्यात आली हे हि कौतुकास्पदच होते. शाळेला शासनाने अटल lab , रोबोटिक साहित्य, कोडींग साहित्य देखील भेट म्हणून दिली. अश्या उपक्रमात विविध स्तरावत शाळेला यश मिळाले आहे.

- **सोशल मिडियाद्वारे शाळेच्या यशोगाथा व यशाचे कौतुक-** SCERT, MPSP, DIET यांचे WhatsApp, Facebook, Instagram, Twitter, Website व YouTube अश्या समाज माध्यमांवर शाळेतील राबविलेल्या विविध नवोपक्रमांचे कौतुक होवून शाळेची यशोगाथा या शासकीय पोर्टलवर प्रसारित झालेली आहे.नाशिक मनपा, जिल्हा, व राज्यस्तरावर SCERT, शिक्षण आयुक्त कार्यालय, बालभारती, राज्य शिक्षण मंडळ या कार्यालयांच्या सामाजिक माध्यमांवर तसेच इतर टीवी, वर्तमान पत्रे, सामाजिक माध्यमे यावर शाळेतील शैक्षणिक पालकत्व, बुक्स ओन व्हील, खुले वाचनालय, तरंगते वाचनालय, Idea Box, मूल्यशिक्षण अश्या अनेक उपक्रमांचे दाखल घेण्यात येवून राज्यातील शाळा, शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्या पर्यंत ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपात सादर करण्यात आलेल्या आहेत. शाळेतील यशोगाथा समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहचविण्यासाठी सर्व शिक्षक नियमित योगदान देतात.
- **NMMS, Scholarship, Cube स्पर्धा -** NMMS, Scholarship, Cube अश्या स्पर्धांमध्ये जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी यश मिळविलेले आहे. शाळेतील ०१ विद्यार्थ्यास ग्लोबल स्टुडन्त पुरस्कार, ०२ विद्यार्थ्यांना राष्ट्रीय क्यूब स्पर्धेत पुरस्कार आणि ०५ विद्यार्थ्यांना राज्य क्यूब स्पर्धेत पुरस्कार, ०१ विद्यार्थ्यास राष्ट्रीय युवा वैज्ञानिक पुरस्कार, ०१ विद्यार्थ्यास वर्ल्ड बुक रेकोर्ड पुरस्कार, 18 विद्यार्थ्यांना राष्ट्रीय NMMS शिष्यवृत्ती, ०8 विद्यार्थ्यांना राज्य सरकार शिष्यवृत्ती, 04 विद्यार्थ्यांना BTS शिष्यवृत्ती, 04 विद्यार्थ्यांना Manthan शिष्यवृत्ती प्राप्त, 02 विद्यार्थ्यांना Inspired Award प्राप्त झालेले आहेत.
- **"शैक्षणिक पालकत्व ... एक हात मदतीचा":** विद्यार्थ्यांसाठी अध्यापन अधिक प्रभावी होण्यासाठी मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकांनी सामाजिकदृष्ट्या संवेदनशील विषय शाळेशी जोडून शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मुलांमध्ये सामाजिक भान पसरविण्याचे काम केले आहे. आमच्या शाळेतील गरीब होतकरू मुलांना त्यांचे शिक्षण पूर्ण करताना कोणत्याही आर्थिक किंवा अन्य कारणाचा सामना करावा लागू नये आणि त्यांचे पुढील शिक्षण अपूर्ण राहू नये यासाठी शाळेतील शिक्षिका श्रीम. कुंदा बच्छाव यांच्या पुढाकाराने शाळेने 2021 मध्ये **"शैक्षणिक पालकत्व ... एक हात मदतीचा"** हा उपक्रम सुरू केला आहे. शाळेच्या मुख्या. सौ. जाधव यांनी यास पूर्ण पाठींबा दिला. आमच्या शाळेत शासनाकडून मिळालेल्या साहित्याव्यतिरिक्त मुलींच्या शाळेसाठी लागणारे साहित्य जसे की नोटबुक, स्कूलबग्स, कंपास, सॅनिटरी नॅपकिन, टॅब, लॅपटॉप असे साहित्य सोसायटीकडून मिळवून मुलांना उपलब्ध करून दिले. शाळेतील ज्या मुलींना आई वडील नाही त्यांना शिक्षणासाठी तसेच इतर आर्थिक,भौतिक मदतही आम्ही करतो. थोडक्यात त्यांचे शैक्षणिक पालक बनतो. त्याच वेळी आमच्या या मुली जेव्हा इयत्ता 8 वी ते 9 वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी इतर शाळांमध्ये जातात तेव्हा त्यांच्या फीसह सर्व शैक्षणिक खर्च त्यांच्या पालकांना करावा लागत होता आणि ते त्यांचे पालनपोषण करण्यास असमर्थ होते. त्यामुळे त्यातील 30 ते 40 टक्के मुली शालेय शिक्षण प्रवाहातून बाहेर पडल्या. समाजातील अशा गरजू मुलींना आम्ही आर्थिक व शैक्षणिक मदत करतो. त्यामुळे त्या मुली त्यांचे उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करू शकतात. आमच्या या शैक्षणिक पालकत्व सामाजिक अभियानाच्या माध्यमातून गरिबीमुळे शिक्षण पूर्ण करू शकलेल्या 130 मुलींना 130 शैक्षणिक पालक सामाजिक

भागधारक म्हणून मिळाले आहेत. ते पालक दरवर्षी त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेत त्यांची फी भरतात आणि त्यांना आवश्यक ते शैक्षणिक साहित्यही पुरवतात. मदतनीसांपैकी डॉक्टर आणि अधिकारी आमच्या मुलींना मार्गदर्शन आणि समुपदेशन करतात. या अंतर्गत, आजपर्यंत आम्हाला एकूण 7 लाख रुपये CSR मिळाले आहेत. या कामात केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरील देणगीदार आम्हाला मदत करतात. त्यामुळे आमची शाळा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सामाजिक जबाबदारी पार पाडत आहे. शिक्षणासाठी पालक मिळाल्याने आमच्या शाळेतील मुलींचे बालविवाह बंद झाले, जे आमच्या परिसरातील झोपडपट्टीतील अतिशय ज्वलंत समस्या होती. यामुळे आम्ही शाळेतील 130 विद्यार्थ्यांना इयत्ता 8 वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करून उच्च शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रभावित करू शकलो. आमच्या शाळेपासून सुरू झालेला **"शैक्षणिक पालकत्व ... एक हात मदतीचा"** नवोपक्रम आज संपूर्ण महाराष्ट्रभर पसरला आहे. राज्यातील अनेक गरीब मुलींच्या शिक्षणासाठी आम्ही अनेक शैक्षणिक संस्थांचे सहकार्य घेवून विविध कार्यक्रमांचे आयोजन करतो.

- **प्रसार माध्यमांनी घेतलेली शाळेची दखल :** शाळेतील विविध नवोपक्रम तसेच विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश इतरांपर्यंत पोहचविण्यासाठी शाळा नेहमीच अग्रेसर असते. राज्यातील सकाळ, लोकमत, पुढारी, आपला महाराष्ट्र, दैनिक भास्कर सारख्या अनेक वर्तमान पत्रात शाळेत राबविलेले विविध उपक्रम, शाळेस प्राप्त यश यांची दखल नोंदविली गेलेली आहे. यात शैक्षणिक पालकत्व, विज्ञान मेळावा, शिष्यवृत्ती यश, तंत्र दान, ऑनलाईन शिक्षण, महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा सहभाग, दप्तरमुक्त शनिवार, मनपा टॅलेंट सर्च, पुस्तके आली आपल्या भेटीला, मै स्वावलंबी, Selfie with success आदी उपक्रमांचा सहभाग आहे. यामुळे संपूर्ण जिल्ह्यात, पालकांपर्यंत तसेच वरिष्ठ कार्यालया पर्यंत शाळेचे योगदान पोहचते.

## ५. अडचणी दूर झाल्यानंतर मिळालेले दृश्य परिणाम/ फलनिष्पत्ती/ यशोगाथा -

गेल्या दोन वर्षापासून सर्व शिक्षकांच्या समन्वयाने पालकांची नियमित भेट, चर्चा ,पालकांचे वारंवार समुपदेशन, शालेय प्रशासनात त्यांचा सहभाग यादवारे शाळेची गुणवत्ता पालकांपर्यंत पोहचवली, पालकांचा शाळेवर, शिक्षकांवर विश्वास वाढला. शिक्षणाचे महत्व त्यांना शिक्षकांनी पटवून दिले. विद्यार्थ्यांना जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्तरावर विविध स्पर्धांमध्ये यश तर शाळेतील शिक्षकांना व शाळेस शासनाचे विविध पुरस्कार मिळाल्याने शाळेचा नावलौकिक संपूर्ण नाशिक शहरात वाढलेला आहे. महाराष्ट्र शासन आयोजित बालनाट्य स्पर्धेत विद्यार्थ्यांना अभिनयाची संधी व त्यात उत्कृष्ट भूमिकेसाठी त्यांना मिळालेले पुरस्कार, इंडियन क्यूब चॅम्पियन शिप या राष्ट्रीय स्पर्धेत मुलांचा सहभाग व त्यांनी मिळवलेले सुवर्ण व रजत पदक, . महाराष्ट्र राज्य फुटबॉल स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मिळवलेले यशामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला. अशा गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या शाळेवर विश्वास निर्माण होऊन शाळेची प्रगती होण्यासाठी मदत म्हणून समाजातील लोक आपले योगदान देवू लागले. विद्यार्थ्यांमधील ,त्यांच्या पाल्यांमधील अपेक्षित बदल त्यांना दिसले व ते नियमित पणे आपल्या मुलांना शाळेत पाठवू लागले. शाळेची गळती आपोआप कमी झाली. तसेच पटनोंदणी देखील वाढली. आजरोजी शाळेचा पट 785 इतका असून परिसरात सर्वात जास्त पट असलेली ही एकमेव शाळा आहे.

६. **समारोप-** अश्या प्रकारे एक कमी भौतिक सोयी सुविधा असलेली आमची आनंदवली शाळा आज नाशिक शहरातील उत्कृष गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणारी आदर्श शाळा म्हणून नावारूपास आलेली आहे. यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता जाधव व शाळेतील शिक्षिका श्रीमती कुंदा बच्छाव यांच्यासह सर्व शिक्षकांनी, पालकांनी, विद्यार्थ्यांनी, समाजातील दानशूर लोकांनी दिलेल्या योगदानामुळे आज आनंदवली सारख्या झोपडपट्टीतील गरीब विद्यार्थी आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करून पुढील शिक्षण घेत आहेत. समाजातील सर्वच ठरतील गरीब विद्यार्थ्यांना शालेय प्रवाहात टिकवून त्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणारी आमच्या मनपा शाळेचा आम्हाला खूप-खूप अभिमान आहे.

७. **फोटो पुरावे -**

























Shot on OnePlus


Kunda Bachhav
Vaishali Bhamare
Hosneara Khatun
Rupa Mollik Rupa
Divya
Hosneara Khatun
Siddhartha dan...
Activate Windows
Mute
Stop Video
Security
Participants
Chat
Share Screen
Pause/Stop Recording
Reactions










सरकारी कर्मचाऱ्यांना सुरक्षा
प्रदान करण्यासाठी केलेले कायदे


खींचे
PULL


8989 004 777




ईश्वरीय ज्ञान
ही स्वर्णिम दुनिया
का प्रवेश द्वार है।
Idea
Box
7-9pm parent visit | Nashik, Nashik Division | 2024.07.11








Idea
Box
7-9pm parent visit | Nashik, Nashik Division | 2024.07.11 08:51








# महापालिका शिक्षिकेचा 'शैक्षणिक पालकत्व' उपक्रम

## ६० मुलींच्या शिक्षणाचा मार्ग सुकर, समाजाचाही मदतीचा हात

लोकसत्ता प्रतिनिधी


**नाशिक** : मुलांच्या उज्वल भविष्यासाठी उच्च शिक्षण घेणे खूप आवश्यक असते. गरीब कुटुंबातील आणि करोनामुळे आर्थिक विवंचनेत असलेल्या पालकांची परिस्थिती सध्या अजूनच वाईट झाली आहे. त्यातही मुलगी असल्यामुळे दुर्लक्षित झालेल्या अनेक विद्यार्थिनी शिक्षणापासून वंचित राहत आहेत. यामुळे व्यथित झालेल्या नाशिक महापालिका शाळा क्रमांक १८ (आनंदवल्ली) येथील शिक्षिका कुंदा बच्छाव-शिंदे यांनी 'शैक्षणिक पालकत्व'उपक्रम सुरू केला आहे. या माध्यमातून ६० मुलींना शैक्षणिक पालकत्व लाभले आहे.

शाळेतील आठवीपर्यंत शिक्षण घेऊन गेलेल्या विद्यार्थिनी पुढे पदवीपर्यंत शिकून नोकरी व्यवसाय करून स्वावलंबी तर होत नाहीच, उलट शिक्षण मध्येच सोडून कमी वयातच त्यांचे लग्न लावून दिले जात असल्याचे चित्र त्यांना दिसले. शिक्षण बंद होण्याची कारणे शोधल्यावर त्यातील मुख्य कारण घरची बिकट आर्थिक परिस्थिती आणि यातून विद्यार्थिनींची शिक्षणातील गळती आणि बालविवाह या समस्या दिसून आल्या. अशा विद्यार्थिनींना शैक्षणिक पालकत्व देवून त्यांची शैक्षणिक जबाबदारी उचलण्याचे ठरवले आणि सुरुवातीला त्यांनी स्वतः तीन विद्यार्थिनी आणि त्यांचे पती किरण शिंदे यांनी एक विद्यार्थिनी शिक्षणासाठी दत्तक घेतली. पण त्यांच्या सभोवती अशा अनेक हुशार व गरजू विद्यार्थिनी होत्या. ज्यांना शिकण्याची जिद्द होती. परंतु, आर्थिक परिस्थितीमुळे त्यांचे शिक्षण बंद होण्याची वेळ आली होती. या विद्यार्थिनींना शैक्षणिक मदतीची गरज होती. अशा विद्यार्थिनींसाठी मदत म्हणून त्यांनी शैक्षणिक पालकत्व.. एक हात मदतीचा हे अभियान सामाजिक स्तरावर मोठ्या पातळीवर राबवायचे ठरवले.

बच्छाव यांना त्यांच्या अभियानात त्यांची मैत्रिण शिक्षिका वैशाली भामरे-ह्याळीज यांची साथ मिळाली. त्यांनीही दोन विद्यार्थिनींना शिक्षणासाठी दत्तक घेतले. मनपा शिक्षक प्रशांत पाटील हेही या अभियानास जोडले गेले. या सर्वांनी हे अभियान मोठ्या स्तरावर राबवून जास्तीत जास्त विद्यार्थिनींना समाजातून मदत मिळवून द्यायचे ठरवले. समाज माध्यमाचा वापर करत समाजातून या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करण्याचे आवाहन केले. त्यांच्या या विनंतीवजा आवाहनाला समाजातून भरभरून प्रतिसाद मिळाला.

जिल्हाधिकारी सूरज मांढरे यांनी पाच विद्यार्थिनी, पुंजाराम लिपटे यांनी पाच विद्यार्थिनी, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, विलास शिंदे आदींनी पुढे येत विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक पालकत्व दिले. त्याचबरोबर रोटरी क्लब ऑफ नाशिक यांनी आठ विद्यार्थिनी, नयना गांगुर्डे यांच्या पुढाकाराने 'इनरव्हील क्लब जेन नेक्स्ट, नाशिक' यांनी २० विद्यार्थ्यांची पुढील चार वर्षासाठी शिक्षणाची जबाबदारी घेवून त्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले. रणरागिणी मराठा ग्रुप यांनीही काही गरजू विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्य वाटप केले.

लोकसत्ता Fri, 09 July 2021
https://epaper.loksatta.com/c/61676990













लक्ष
दशहजार
हजार
शतक
दशक
एकक
संख्येचे वाचन व अक्षरी लेखन
किंमत

दिव्य मराठी

नाशिक सिटी 04-04-2023

**दिव्य मराठी विशेष** • आनंदवली शाळेत उपक्रम, दैनंदिन अभ्यासासह फॉरेन लँग्वेज शिकणेही झाले सोपे

# मनपा शाळेत विद्यार्थ्यांचे सोबती क्यूआर कोड

प्रतिनिधी | सातपूर

मोबाइलच्या अधीन गेलेल्या व जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शिस्त लागावी यासाठी शाळेतील उपक्रमशील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्मार्ट शिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. यासाठी खास क्यूआर कोड तयार करण्यात आले असून हे क्यूआर कोड आता विद्यार्थ्यांचे सोबती झाले आहेत. 'आमचे सोबती' असे ॲप तयार करून या ॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहज सोपे क्यूआर कोड शाळेतील शिक्षकांच्या मदतीने बनवले आहे.

क्यूआर कोडच्या मदतीने मनपाचे विद्यार्थी जर्मन, स्पॅनिश भाषा शिकले असून त्याची परीक्षा देण्याची तयारीही केली आहे. पालक, विद्यार्थी व शिक्षकांना जोडणारा दुवा असा हा 'क्यू आर कोड, आमचे सोबती' उपक्रम ठरला आहे. शाळेत हा उपक्रम राबविण्यासाठी शिक्षिका कुंदा बच्छाव यांना आनंदवली मनपा शाळेचे मुख्याध्यापक कैलास ठाकरे , वैशाली भामरे व सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले. मुंबई येथे झालेल्या राष्ट्रीय क्यूब चॅम्पियनशिप स्पर्धेत आनंदवली मनपा शाळेतील दोन विद्यार्थिनींनी गोल्ड व सिल्व्हर मेडल मिळवून यश संपादन केले. महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत, पोवाडा गायन स्पर्धेत सहभागी होऊन बक्षिस मिळविले.





क्यू आर कोडद्वारे विविध विषय समजून घेताना आनंदवली शाळेतील विद्यार्थी.

### सोपेपणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला



*विद्यार्थ्यांना गायन, वादन, क्यूब, चेस, कॅरम, परसबाग, अबॅकस, अभिनय याचे शिक्षण दिल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळेच ते आता क्यूआर कोड बनवत शिक्षणाचा आनंद घेत आहेत. ही अत्यंत सोपी पद्धत असल्याने ते रमत आहेत.*

**– कुंदा बच्छाव** , उपक्रमशील शिक्षिका




4:54
रचना व नवरचना विद्यालय, पालक-शिक्षक संघ, आयोजित
नाशिक
गौरव
Like
Comment


Nashik's Biggest


श्री गणेश मार्बल्स
ABH DEVELOPERS
Presents
HAPPY
street




## 8. लिंक्स पुरावे-

https://www.youtube.com/watch?v=-Nf4ySol1Og

https://youtu.be/oO2i_ozz1gs?si=fo15E40fQR3kw52N&sfnsn=wiwspwa

https://youtu.be/SQE3FV5hIH0?si=tH2XRCf5VdXDVnUW

https://youtu.be/VtzXuAj1xL0?si=xfAjicWNKhPIZtZi

https://youtu.be/MXbruNAzc_0?si=4LQlrMbOCHbkdwtJ

https://youtu.be/IQHnaNh0nXE?si=LL6lcr24rGKL6F9K

https://youtu.be/-YAJ_Rj66kA?si=ctqhoMmCnd4EiOVj

https://youtu.be/H1M1fYlOKto?si=Co1Nor3d1NabLuT8

https://youtu.be/QeT_RZ1IRUo?si=a2101Z_sp3dO2Rn0

https://youtu.be/84V4L0Sp-l8?si=ZDzaAIprQ_T3o2K6

https://youtu.be/NNt7HF_H8aM?si=ZxRl33L_5xYTcV8d

https://youtu.be/bpc6jmjknSQ?si=15dIj4tW0_CSk3QH